UGC Approved Vidyawarta Issue-22 Vol-02


MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

UGC Approved Refereed Journal Jr.No.62759

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Issue-22, Vol-02 April to June 2018



Rani Laxmibai Mahavidyalaya IQAC PAROLA Dist.Jalgaon

IQAC PAROLA Dist.Jalgaon

18-19

Scanned with OKEN Scanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

April To June 2018
Issue-22, Vol-02

Ranilaxmibai Mahavidyalaya IQAC PAROLA Dist.Jalgaon

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

25) हातगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व || 114
प्रा. जाधव नितीन साहेबराव-डॉ.व्ही.एस.देसले

26) देशातील सामाजिक परिवर्तनासाठी विदर्भातील चळवळी योगदान || 121
डॉ. सचिन जयसवाल, यवतमाळ (महाराष्ट्र)

27) शिवकालीन व स्वातंत्र्योत्तर काळातील महाष्ट्रातील शेतीविषयक धोरणांचा ..... || 125
रामचंद्र वसंत कुंभार, कोल्हापूर

28) अमळनेर तालुक्यातील निस्पृह कामगार नेता - दाजिबा पाटील || 130
प्रा. डॉ. सुनिल सी. अमृतकर-प्रा. मनिष आर. करंजे

29) लोकसभा निवडणूक व महिलांचा राजकीय सहभाग || 132
प्रा.विजय एस.कांडलकर, नागपूर

30) विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या || 136
प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार, कुरखेडा जि. गडचिरोली

31) समकालीन हिन्दी नाटको में रंगधर्मी नाटककार || 140
प्रा.पाटील एस.डी., जाफ्राबाद जि.जालना

32) 'ऐलान गली जिंदा है' उपन्यास में आँचलिकता || 143
डॉ. बळीराम संभाजी भुक्तरे, उदगीर, जि. लातुर, (महाराष्ट्र)

33) विभिन्न समुदाय की वयस्क महिलाओं की आहार संबंधी आदतें एवं...... || 146
डॉ.प्रगति देसाई—कु.नीलम सोलंकी, इन्दौर

34) ममता कालिया की साठोत्तरी कहानियों में चित्रित पारिवारिक समस्याएँ || 150
प्रा. डॉ. सुचिता जगन्नाथ गायकवाड, सोलापुर, महाराष्ट्र।

35) औरंगजेब कालीन सामाजिक स्थिति: एक संक्षिप्त ऐतिहासिक अवलोकन || 154
डॉ० नीरज कुमार गौड़, गुरूहरसहाय, फिरोजपुर. (पंजाब)

36) महर्षि दयानन्द सरस्वती के शैक्षिक विचारों की प्रासंगिकता || 159
यतेन्द्र पाल, आगरा, उत्तर प्रदेश

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

IQAC Rani Laxmibai Mahavidyalaya PAROLA Dist.Jalgaon



Scanned with OKEN Scanner

28

# अमळनेर तालुक्यातील निस्पृह कामगार नेता - दाजिबा पाटील

**प्रा. डॉ. सुनिल सी. अमृतकर**
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे, जि. धुळे.

**प्रा. मनिष आर. करंजे**
राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा, जि. जळगांव.

**********

**पूर्वायुष्य -**

**प्रास्ताविक**

दाजिबा पर्वत पाटील यांचा जन्म दि. २३ सप्टेंबर १९२५ रोजी लोहारी ता. पाचोरा येथे पर्वत पाटील व सौ. अनुसयाबाई पाटील यांच्या पोटी झाला. घरची परिस्थिती अतिशय गरिबीची होती. परंतू मनात मोठे होण्याची स्वप्न बाळगली होती. या स्वप्नपूर्ती करिताच त्यांनी विद्यार्थीदशेत अनेक ठिकाणी नोकरी केली तसेच कॉंग्रेस कार्यालयाची कामे करून आपले शिक्षण त्यांनी पूर्ण केले. पुणे विद्यापीठाची बी.ए. पदवी संपादन केली. पित्याचे छत्र जास्त काळ त्यांना लाभू शकले नाही. पण माता -अनूसयाबाई यांनी प्रताप मिल मध्ये कामास लागून पूत्राचे पालन केले. आई गिरणीत कामाला असल्याने कामगारांचे प्रश्न काय असतात, याची ओळख बालपणापासूनच दाजिबांना होती हे प्रश्न सोडविण्याकरिताच भविष्यात त्यांनी कामगार संघटनांमध्ये विविध जबाबदारीची पदे भुषवुन एक ख्यातनाम कामगार नेता म्हणून आपली ओळख निर्माण केलेली दिसून येते. रा.मि. मजूर संघटनेचे सेक्रेटरी, महाराष्ट्र इंटकचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रामिण कापड कामगार महासंघाचे अध्यक्ष, प्रताप मिलचे डायरेक्टर, विविध संस्थेचा पदाधिकारी एवढेच नव्हे तर आमदार म्हणून दोन वेळा निवडून येऊन महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती पदाचा बहूमान तीन वर्षे मिळाला. ध्येयाच्या वाटचालीत आनंददायक क्षण अमळनेर प्रताप गिरणीतील कामगार व मातेचा सुपूत्र या दृष्टीकोनातून प्रताप गिरणीतील कामगारांना व त्याचप्रमाने नागरिकांना व अमळनेर तालुक्याला अभिमान आहे.

**कामगार संघटनेत सहभागी -**

अमळनेरच्या कामगार चळवळीला बराच मोठा इतिहास आहे. आणि ह्या कामगार चळवळीच्या इतिहासात मार्ननिय दाजिबा पाटील यांनी स्वकर्तृत्वाने एक महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे.१

१९४७ पूर्वी अमळनेर प्रताप मिल कामगारांची संघटना कम्युनिस्ट प्रेरित गिरणी कामगार युनियनच्या नेतृत्वाखाली होती. गिरणी मालकाशी असहकार व असंतोषाचे वातावरण नेहमी असायचे. ७ मे १९४७ रोजी अमळनेरला इंटक प्रणित राष्ट्रीय मिल मजूर संघाची स्थापना झाली. कामगारात राष्ट्रीय भावनेची प्रेरणा निर्माण करून कामगारांचे कोणतेही प्रश्न सलोख्याने शांततेच्या मार्गाने सोडविण्याचे धोरण ठेवले. गिरणी कामगार युनियनच्या कामगारात प्रताप मिल जूनी व नवी सोसायटीत जे वर्चस्व व पगडा होता. त्यास दाजिबा पाटील यांनी धैर्याने तोंड देऊन कामगारांचे प्रश्न सलोख्याने व शांततेच्या मार्गाने संपाचा व असहकाराचा अवलंब न करता कामगारांच्या मागण्या पदरात पाडून घेतल्या. प्रताप मिल जुनी व नवी सोसायटी राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली आणल्या.

**कार्यक्षेत्र -**

कामगारांचे प्रश्न सोडवत असतांना दाजिबांच्या लक्षात आले की, 'विना सहकार - नाही उद्धार' आणि म्हणूनच त्यांनी सहकार चळवळीकडे आपले लक्ष केंद्रीत करून 'जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे डायरेक्टर पदाच्या चुरशीच्या निवडणुकीत सन १९७३, व त्यानंतर सन १९७८ मध्ये निवडणूकीला सामोरे जाऊन यश प्राप्त केले.२

स्वातंत्र्योत्तर काळात बदलत्या आर्थिक स्थितीला सामोरे जाण्यात प्रताप मिल अपयशी ठरली. प्रताप मिलची आर्थिक स्थिती ढासळू लागली. सन १९६३ मध्ये प्रताप मिल बंद पडली असता, कामगार चळवळ उभारून माजी संपर्क मंत्री ना. मधुकरराव चौधरी यांच्या नेतृत्वाखाली इंटकचे शिष्टमंडळ सरकारला भेटले. ना. यशवंतराव चव्हाण यांनी पुढाकार घेऊन प्रताप मिलवर अवलंवून असणारा अमळनेर तालुक्याचा विचार करून एप्रिल १९६३ मध्ये अमळनेरची प्रताप मिल केंद्र सरकारला द्यावयास भाग पाडले. पुढे महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात प्रताप मिल देण्यात येऊन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाच्या ताब्यात मिलचा कारभार सोपवला. मिलला लिक्वीडेशन मधुन वाचविण्यात कामगारातर्फे दाजिबा पाटील व त्यावेळेचे प्रताप मिलचे प्रशासक टेक्सटाईल तज्ञ एस.ए. खेर साहेब यांनी सर्वतोपरी सहकार्य देऊन जे नेतृत्व व पुढाकार घेऊन दाजिबा पाटील यांनी कामगारांप्रति बहुमोल सहकार्य केले. हे अमळनेर व प्रताप मिलचे कामगार कधीही विसरू शकणार नाही.३



Scanned with OKEN Scanner

११० कामगार व बेघर लोकांसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. आणि आजही 'दाजिबा नगर' मध्ये लोक आनंदाने राहत आहे.९

**निष्कर्ष -**

जळगांव जिल्ह्याने स्वातंत्र्य चळवळीत सर्वार्थाने योगदान दिले आहे. या चळवळीतूनच अनेक राजकीय सामाजिक नेतृत्व उदयास आले. त्यापैकीच एक दाजिबा पर्बत पाटील हे होते. दाजिबांनी जे कामगारांचे आयुष्य जवळून पाहिले त्यामुळेच कामगारांप्रती कळवळा त्यांच्या मनात निर्माण होऊन त्यांनी त्याकरिता इंटक संघटना व मजुर संघटना इ. संघटनांमध्ये हिरिरिने सहभाग नोंदवला. कामगारांचे प्रश्न सोडवण्याबरोबरच त्यांनी तळागाळातल्या लोकांचे प्रश्न सोडवण्याकरिता नगरपालिका, सहकारी सोसायट्या व विधान परिषदचे आमदार म्हणून त्यांनी आपली जबाबदारी जनहितार्थ पार पाडली. त्याचीच फलश्रुती म्हणून त्यांना विधान परिषदेचे उपसभापती म्हणून काम पाहण्याचा सन्मान मिळाला. हा सन्मान संपूर्ण अमळनेर तालुक्यातील जनतेच्या व कामगारांचा होता असे म्हणावे लागेल. एकंदरीत साने गुरूजींपासून सुरू झालेली कामगार चळवळ दाजिबा पाटलांनी पुढे चालू ठेवलेली दिसून येते.

**संदर्भ :-**


१) अमळगांवकर मधुकर, 'अमळनेर वार्ता' दादासो दाजिबा पाटील शुभेच्छा विशेषांक - संपादक राजकुमार छाजेड, दि. २३ सप्टें १९८९, पृ. ६.

२) कित्ता, पृ. ६.

३) कित्ता, पृ. ६.

४) दैनिक लोकमत बुधवार दि. २५ मार्च २०१५.

५) उपरोक्त, पृ. ७.

६) पाटील प्रकाश आर, 'अमळनेर वार्ता' दादासो दाजिबा पाटील शुभेच्छा विशेषांक - संपादक राजकुमार छाजेड, दि. २३ सप्टें १९८९, पृ. ४.

७) कित्ता, पृ. ४.

८) पाटील मनोज भाऊराव, मुलाखत, दि. १९/११/२०१७.

९) खराटे राजाराम सोनू, 'अमळनेर वार्ता' दादासो दाजिबा पाटील शुभेच्छा विशेषांक - संपादक राजकुमार छाजेड, दि. २३ सप्टें १९८९, पृ. १५.


❑❑❑

**29**

# लोकसभा निवडणूक व महिलांचा राजकीय सहभाग


प्रा.विजय एस.कांडलकर
सहाय्यक प्राध्यापक
संताजी महाविद्यालय, वर्धा रोड, नागपूर



**सारांश:**

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर महिलांचा राजकिय सहभाग वाढविण्याच्या दृष्टिने अनेक प्रयत्न करण्यात आले. उदा. शासकिय धोरण, आरक्षण, सबलीकरण, स्त्री—पुरूष समानता, सांविधानिक प्रयत्न इत्यादी तरीसुध्दा महिलांचा राजकिय सहभागाच्या दृष्टिने पाहिजे त्या प्रमाणात सहभाग वाढविता आला नाही. लोकसभा निवडणूकीच्या संदर्भात पाहता त्याचे प्रमाण अतिशय अल्प असेच म्हणावे लागेल. प्रथम लोकसभा निवडणूकीपासून तर २०१४ च्या सोळाव्या लोकसभा निवडणुकीपर्यंत दृष्टिक्षेप टाकल्यास महिलांचा राजकिय सहभाग त्यातही निवडणूकीच्या संदर्भात ही टक्केवारी महिलांच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात कमीच आहे असे चित्र दिसते. लोकशाही शासन व्यवस्थेत समानतेच्या तत्वाचा अवलंब करून सुध्दा प्रत्यक्षात असमानता दिसून येत आहे. वर्तमान काळात भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन अनेक वर्षे झाली. तरीसुध्दा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन तसेच त्याकरीता करण्यात आलेले प्रयत्न कमीच पडत आहे. लोकशाही शासन व्यवस्थेच्या दृष्टिने ही बाब योग्य नव्हे. महिलांचा राजकिय सहभाग (निवडणुकीच्या संदर्भात) वाढविण्याच्या दृष्टिने व त्यांना पक्षात सामिल करून घेण्याचा विशेष प्रयत्न झालेला नाही. केवळ आरक्षणाचा कोटा पूर्ण करणे असे नसून लोकशाही बळकट करण्याकरिता महिलांना राजकिय प्रवाहात आणणे व राजकारण




Scanned with OKEN Scanner